निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३२० * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * गुरूवार दि.२६ मार्च २०२६ | * पाने-४

# ...तर लिंबू-मिरच्यांनी युद्ध जिंकता आले असते; मुख्यमंत्री फडणवीसांचे वक्तव्य

## अशोक खरातबाबत काही माहिती असल्यास सरकारकडे देण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – राज्यात सध्या अशोक खरात प्रकरण चर्चेत आहे. या भोंदू अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी केली जात आहे. पण याच अशोक खरातबरोबर अनेक नेत्यांचे फोटो समोर आल्यामुळे राजकारण तापलं आहे. या प्रकरणात रुपाली चाकणकर यांनाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाचे विधानसभेतही पडसाद उमटले आहेत.

दरम्यान, अशोक खरात प्रकरणाबाबत विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तर दिलं. तसेच कोणाकडे अशोक खरातबाबत काही माहिती असल्यास सरकारकडे देण्यात यावी, असं आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

“भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाबाबत मंगळवारी सभागृहात मी सविस्तर निवेदन सादर केलं. काही सदस्यांनी त्याबाबतही आपलं मत व्यक्त केलं. मी सर्वांनाच विनंती करतो की ज्यांच्या-ज्यांच्याकडे भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाबाबत काही माहिती आली असेल तर त्यांनी ती माहिती सरकारपर्यंत पोहचवावी. कारण या प्रकरणाची संपूर्ण पाळंमुळं खोदून भोंदूबाबा अशोक खरातला दंडित करायचं आहे. कारण अशा प्रकारे वागणाऱ्या लोकांना जरब बसली पाहिजे”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.



“आपण सर्वजण श्रद्धा मानणारे लोक आहोत. आपण अश्रद्ध लोक नाही आहोत. मात्र, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामध्ये एक खूप छोटी रेष आहे. अंधश्रद्धेमध्ये लोक कशा प्रकारे विवेक हरवतात हे आपल्याला या खरात प्रकरणात पाहायला मिळालं. आपला महाराष्ट्र थोर परंपरा असलेला महाराष्ट्र आहे. मात्र, कोणत्याही संतांनी अंधश्रद्धेला स्थान दिलेलं नाही. त्यामुळे देवत्व कुठे पाहिलं पाहिजे याचाही विचार करण्याची वेळ आली आहे”, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. “आपला महाराष्ट्र धर्म हा वाढला पाहिजे. मात्र, भोंदूगिरीला कुठेही स्थान मिळता कामा नये. त्या अनुषंगाने आपण काम केलं पाहिजे. जादूटोणा विरोधी कायदा आहे, त्याचे काही नियम झाले नाहीत हा विषय देखील आपल्याकडे आला. ते खरं आहे. मी त्याबाबत माहिती घेतली असता त्याबाबतचे काही नियम हे अंतिम टप्प्यात आहेत. आपल्याला माहिती आहे की जर जादूटोणा करून जर समस्या संपल्या असत्या तर भोंदू खरातला आपण ट्रम्प यांचा सल्लागार नेमलं असतं, म्हणजे सुरक्षा सल्लागार. त्यामुळे काय झालं असतं की युद्ध जे आहे ते आपण ड्रोन ऐवजी लिंबू-मिरच्यांनी लढलो असतो. दहशतवाद्यांनाही आपण या ठिकाणी बसूनच टाचण्यांनी संपवून टाकलं असतं. मग देशाच्या सीमेवरही सैन्य पाठवण्याची गरज पडली नसती. पाच-सहा भोंदूबाबा पाठवले असते. तसेच आपल्यालाही सभा घ्याव्या लागल्या नसत्या. एका जागेवर बसून निवडणुका जिंकता आल्या असत्या”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी शुक्रवारी रोजगार मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली** – जिल्ह्यातील सुशिक्षित नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच मॉडेल करिअर सेंटर, हिंगोली यांच्या वतीने शुक्रवार, (दि. २७) रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात पैनगंगा इंटरनेशनल स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कन्हेरगाव नाका, खंडेलवाल ज्वेलर्स, हिंगोली तसेच संकल्प जॉब प्लेसमेंट, हिंगोली या आस्थापनांचा सहभाग राहणार आहे.

जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, डी.एड., बी.एड., एम.एड., पदवी व पदवीधर पात्रता असलेल्या नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती व बायोडाटासह शुक्रवार, दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

या रोजगार मेळाव्याबाबत अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४५६-२२४५७४ किंवा ७३८५९२४५८९ वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त बा. सु. मरे यांनी केले आहे.

# पॅनिक पर्चेसमुळे पेट्रोल डिझेलचा कृत्रिम तुटवडा

## नागरिकांनी लागेल तितकेच पेट्रोल खरेदी करावे पेट्रोल डिझेल गॅसचा अजिबात तुटवडा नाही, तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकरयांचे आवाहन

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – नांदेड जिल्ह्यात सह किनवट तालुक्यात पेट्रोल डिझेल गॅस चा अजिबात तुटवडा नाही परंतु फालतू अफवांमुळे नागरिक गरजेपेक्षा जास्त पेट्रोल डिझेल गॅस खरेदी करत असल्याने कृत्रिम तुटवडा निर्माण होत असून नागरिकांनी दररोज प्रमाणे लागेल तितकेच पेट्रोल डिझेल खरेदी केल्यास पेट्रोल पंपावरील पेट्रोल संपणार नाही सर्वांना पेट्रोल डिझेल मिळेल त्यासाठी नागरिकांनी घाबरून न जाता नियोजनबद्ध आवश्यक तितक्याच पेट्रोल डिझेल ची खरेदी करावी असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड यांनी केल्याने किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी पेट्रोल डिझेल गॅस भरपूर आहे घाबरण्याचे कारण नाही बिनधास्त रहा असे आवाहन केले आहे

अनेक पेट्रोल पंपावर पेट्रोल संपल्याचे दिसत आहे त्याचे कारण सांगताना तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी सांगितले की जो व्यक्ती नियमित मर्यादित पैशांचे पेट्रोल डिझेल खरेदी करतो तो व्यक्ती टँक फुल करून घेतोय. यालाच पॅनिक पर्चेस म्हणतात. यामुळे पंपावर गर्दी होत



आहे जी सांभाळण्यासाठी पंपावर पुरेशी यंत्रणा नाही. पोलिस फक्त संरक्षण करू शकतात पण पंपावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामाच्या मर्यादा आहेत. पॅनिक पर्चेस मुळे टँकर येईपर्यंत स्टॉक संपतो त्यामुळे पेट्रोल पंपावरील पेट्रोल डिझेल लवकर संपत असल्याने पंप काही वेळेसाठी नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून बंद करण्यात येत आहेत

पेट्रोल पंपाना पेट्रोल डिझेल पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी आता ॲडव्हान्स पेमेंट सिस्टिम सुरू केली आहे यामुळे टँकर येण्यासाठी थोडा वेळ लागतो पूर्वी पेट्रोल डिझेल टँकर मागवल्यावर ४ दिवसांत पेमेंट केले जायचे सध्या यात बदल झाले आहेत परिणामी टँकर ॲडव्हान्स पेमेंट नंतर भरून निघतो नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पेट्रोल डिझेल गॅस उपलब्ध आहे.

फक्त पंपावर ग्राहकांनी पॅनिक खरेदी बंद केली आणि अनावश्यक गर्दी कमी केली तर संपूर्ण जिल्ह्याला अडचण येणार नाही यासाठी नागरिकांनी निर्धारित आवश्यक तेवढेच पेट्रोल डिझेल गॅस खरेदी करावे त्यामुळे इतरांना त्रास होणार नाही तरीही नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही सतर्क राहून खरेदी करावी असे आवाहन तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी केले आहे.

# किनवट नगर परिषदेत ‘नमो उद्यान’ विकास कामाचे भूमिपूजन संपन्न

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – किनवट नगर परिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ०३ बेल्लोरी येथील नगरपरिषद मालकीच्या खुल्या जागेत ‘नमो उद्यान’ विकसित करण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हा सोहळा किनवट नगरीच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद येंड्रलवार यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.

सदर उद्यान विकास काम हे वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी अनुदान योजना सन २०२४-२५ अंतर्गत मंजूर करण्यात आले असून या कामासाठी एकूण १ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. नगर परिषद बांधकाम विभागाच्या कार्यादेश क्रमांक बांधकाम विभाग/५४४/२०२६, दिनांक ०९ मार्च २०२६ नुसार या कामास अधिकृत सुरुवात करण्यात आली आहे. काम पूर्ण करण्यासाठी ३६५ दिवसांची मुदत देण्यात आली



आहे. या प्रकल्पाचे कंत्राट दिनेश कन्स्ट्रक्शन कंपनी, नांदेड (प्रो. प्रा. किरण दिनेश देशमुख) यांना देण्यात आले असून नियोजित वेळेत दर्जेदार काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ‘नमो उद्यान’ विकसित झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना विरंगुळा, व्यायाम तसेच पर्यावरणपूरक वातावरण उपलब्ध होणार असून शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

या भूमिपूजन प्रसंगी नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्यासह नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, उपाध्यक्ष श्री. मोहम्मद हसनखान म. नुरखान पठाण, मुख्याधिकारी श्री. मुगाजी काकडे तसेच इतर मान्यवर व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी या प्रकल्पामुळे शहराच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त केले तसेच काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित कंत्राटदाराला देण्यात आल्या.

या भूमिपूजन सोहळ्याला नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्यासह नगरसेविका ललिता मारोती मुनेश्वर, नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, माजी उपाध्यक्ष अभय महाजन, सभापती श्रीराम नेम्मानिवार, सामाजिक कार्यकर्ते मुकेश नेम्मानिवार, मारोती मुनेश्वर, इम्रान शेख चांद, अन्वर मिर्झा, शहबाज खान पठाण, शेख अली, आरिफ भाटी, प्रभु कोल्हे, मिना नेम्मानिवार, निरजा नेम्मानिवार, मनिष ताडपेल्लीवार, संतोष बंडीवार, रोहन पिसारीवार यांच्यासह अनेक मान्यवर व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संबंधित कंत्राटदारास काम दर्जेदार पद्धतीने व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रकल्पाची नियमित पाहणी करून गुणवत्तेवर विशेष लक्ष देण्याचे निर्देशही प्रशासनाकडून देण्यात आले.

# हिंगोली येथील टपाल कार्यालय आडीएक्स बॉम्बने उडविण्याची धमकी हिंगोलीत खळबळ

## सर्तकतेच्या दृष्टीने बॉम्ब शोधक व नाशक पथकासह श्वान पथकाने केली तपासणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली**– महाराष्ट्र राज्यातील सर्व पासपोर्ट व टपाल कार्यालयात बुधवारी दुपारच्या सुमारास सायनॉईड विषारी वायुमिश्रीत १६ आररडीएक्स बॉम्बद्वारे उडविण्याच्या धमकीचा ई-मेल आल्याने हिंगोलीतील टपाल कार्यालयात अलर्ट देऊन बॉम्बशोधक व नाशक पथकाने संपूर्ण परिसराची पाहणी केली.

या बाबत मिळालेली माहिती अशी की, राज्यातील टपाल कार्यालयाना २५ मार्च बुधवार रोजी एक ई-मेल प्राप्त झाला. तुमच्या राज्यातील सर्व पासपोर्ट व टपाल कार्यालयात दुपारी १२.१० मिनिटांनी सायनॉईड विषारी वायुमिश्रीत १६ आरडीएसक्स बॉम्बचा स्पोर्ट होणार आहे. त्यामुळे टपाल कार्यालयातील सर्वांना तातडीने बाहेर काढा असे ई-मेल नमुद केले होते. हा ई-मेल आल्याने बऱ्याच टपाल कार्यालयात एकच खळबळ उडाली. या बाबतची माहिती पोलिस यंत्रणेला देण्यात आली.

त्याच निमित्ताने हिंगोली शहरातील डाक विभागाच्या मुख्य कार्यालयात तात्काळ हिंगोली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदिप मोदे, जमादार अशोक धामणे, गणेश लेकुळे, शेख मुजीब,संतोष करे, गणेश वाबळे, संजय मार्के, पोलिस उपनिरीक्षक मधुकर नागरे, रवि गंगावणे, अभिजीत हलगे, गंगाधर राऊत, माधव मुटकुळे, रोहित मुदीराज, प्रविण बांगर, दहशतवाद विरोधी शाखेचे अमित मोडक, फुलाजी सावळे, विशाल घोळवे, दहशतवाद विरोधी पथक नांदेड विभागाचे रवि धाबे, शेख मुजीब आदी कर्मचाऱ्यांचे पथक तात्काळ घटनास्थळी धडकले. या ठिकाणी डाक विभागाच्या इमारतीसह संपुर्ण परिसराची बॉम्बशोधक व नाशक पथक आणि श्वान पथकाद्वारे करण्यात आली. या दरम्यान कुठेही आक्षेपार्ह बाव आढळून आली नसल्याचे पोलिस सुत्राने सांगितले. त्यामुळे नागरीकांना कुठेही कोणतीही संशयीत वस्तू अथवा काही वाव आढळून आल्यास त्याची माहिती तात्काळ पोलिस यंत्रणेला द्यावी तसेच कोणत्याही अफवांवर नागरीकांनी विश्वास ठेऊ नये असे आवाहन जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.


# भिमजयंती च्या नावाने वर्गणी करून पोट भरणारे दलाल सक्रीय..!! विविध कार्यालयाकडून अन्नदानाच्या नावाखाली वर्गणी?

## माहूर शहरात बनावट पावत्यांच्या आधारे वर्गणी गोळा करणारा एक भामटा पत्रकार आढळला

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

माहूर - भिमजयंती च्या नावाने वर्गणी करून पोट भरणारे दलाल सक्रीय झाले असून शहरातील विविध कार्यालयाकडून तसेच नामांकित डॉक्टरांकडून अन्नदानाच्या नावाखाली वर्गणी गोळा करत असताना शहरात नांदेड येथील परंतू तालुक्यातीलच एक भामटालव फेक पत्रकार बनावट पावत्यांच्या आधारे अन्नदान या नावाखाली वर्गणी गोळा करीत असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या नावाने पुन्हा एकदा संधीसाधू वर्गणीकार मंडळी आपली झोळी भरून रस्त्यावर आल्याचे दिसून येत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे तळागाळातील शोषित-पिडीत घटकांच्या उन्नत्तीचा मार्ग खुला करून त्यांना ख-या अर्थाने स्वाभिमानाने जिवन जगण्याची दिशा देणा-या महामानवाचा जयंतीसोहळ्याचा एक आगळा वेगळा सण..! त्यांची जयंती केवळ १४ एप्रिल याच दिवशी नव्हे तर उत्सव संपुर्ण महिनाभर साजरा केली जाते. परंतू, याच संधीचा फायदा उठवत काल दि. २३ मार्च रोजी माहूर शहरातील विविध ठिकाणी नांदेड येथील एक स्वयंघोषित फेक पत्रकार “डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती च्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोर भव्य अन्नदान वाटप..“ या शिर्षकाखाली वर्गणी गोळा करताना आठळला.







दरम्यान चालू वर्षात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती असताना तो वर्गणी गोळा करणारा इसम चक्क मागील वर्षाच्या म्हणजेच १३४ व्या जयंती उत्सवाच्या पावत्या घेवून संपुर्ण जिल्हाभर वर्गणी गोळा करीत भटकत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यावरही अतिरेक म्हणजे तो नेमका कोणत्या ठिकाणी व कोणत्या गावी हे अन्नदान करणार आहे याची कोणत्याही प्रकारची नोंद पावतीवर नसून पावतीवर अनुक्रमांक ही नाही केवळ पैसे गोळा करण्यासाठीच हा गोरखधंदा करीत असल्याचे त्याच्या एकंदरीत कृतीवरून दिसून आले आहे. परिणामी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून वर्गणीच्या नावाखाली पैसे गोळा करणा-या भिकारचोटांनी आपली दुकानदारी सुरू केली असून अशा प्रकारचे वर्गणीकार समोर आल्यास अशा बाहेरून येणा-या लोकांवर विश्वास ठेवू नये. एवेच नव्हे तर त्यांची संपुर्ण माहीती, फोटो, ठिकाण याबाबतची माहीती घेवून सरळ पोलीस ठाण्यात तक्रार करावी किंवा तातडीने स्थानिक आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी असे आवाहन आंबेडकरी समाजाकडून करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे माहूर येथील एका प्रतिष्ठीत वैद्यकीय व्यवसाय करणा-या डॉ. जगताप यांच्या हॉस्पिटलमध्ये वर्गणी गोळा करण्यासाठी गेल्यानंतर या इसमाने स्वत: पत्रकार असल्याचे सांगितले असून इंप्रेशन मारण्यासाठी स्वत:चे पत्रकार असल्याचे बनावट प्रेस आय डी कार्ड देखील दाखवले. त्यावर वसंत राठोड असे नाव असून हा वसंत राठोड नामक भामटा नेहेमीच माहूर शहरातील विविध कार्यालयात भिकमांगो आंदोलनासाठी चकरा मारत हे तालुक्यातील बहुतांश पत्रकार मंडळींना माहीत आहे. तथापि, बनावट पावत्यांच्या आधारे वर्गणी वसूली करत असताना प्राप्त झालेल्या सिसिटीव्ही फुटेज वरून तो हाच असल्याची खात्री झाल्यानंतर पत्रकार कंधारे यांनी त्याच्या ९७६७९७९२५६ या मोबाईल नंबरवर संपर्क करून त्याला जाब विचारण्याचा प्रयत्नही केला. परंतू हा फकाट वसूली किंग प्रचंड दारूच्या नशेत असूनही त्यांच्या बोलण्याचा सुर लक्षात आल्यानंतर सुरूवातीला टाळटाळ करणारी उत्तरे देवून नंतर त्याने बोलण्याचे टाळून मोबाईल बंद केला..सदरचा फकाट हा स्वत:ला नांदेड येथील सांगत असला तरीही मुळचा माहूर तालुक्यातील मांडवा येथील असल्याचे सांगण्यात येत आहे.

# शेती कर्जमाफीचे दुष्टचक्र

महाराष्ट्र सरकारने शेतकरी बांधवांसाठी नवीन कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. ३० लाख शेतकऱ्यांचे प्रत्येकी दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करून देणारी ही ताजी योजना आणि यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा आढावा २०२६-२७च्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसाठी नवीन कर्जमाफी योजना जाहीर केली. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज संपूर्णपणे माफ होईल. या योजनेचा लाभ साधारण ३० लाख शेतकऱ्यांना होऊ शकेल. या ३० लाखांपैकी साधारण २० लाख शेतकरी नियमितपणे कर्जफेड करणारे, तर साधारण १० लाख शेतकरी थकबाकीदार आहेत.

या योजनेमध्ये सरकारने साधारण ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. इतका मोठा खर्च असूनसुद्धा सरकारची वित्तीय परिस्थिती मजबूत असल्यामुळे सरकारी खजिन्यावर फारसा ताण येणार नाही आणि शेतकरी बांधवांचे हितरक्षण करण्यासाठी सरकार तो ताण सहज सहन करेल. काळजी करण्याचे कारण नाही, असा सरकारचा विश्वास आहे. या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने गेल्या दहा वर्षांमध्ये जाहीर केलेल्या एकूण कर्जमाफी योजनांचा एकत्र आढावा घेणे सयुक्तिक ठरेल.

'शेतकरी' या शब्दाची सरकारी किंवा कायदेशीर व्याख्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये एकच आणि एकजिनसी नाही. तथापि या लेखामध्ये आपण सरकारी व्याख्या थोडी बाजूस ठेवून अर्थशास्त्रीय व्याख्या स्वीकारणार आहोत. कारण अनेक अर्थशास्त्रीय अभ्यास, सर्वेक्षण यामधून अर्थशास्त्रीय व्याख्या स्वीकारलेली असते. त्याप्रमाणे 'ज्या व्यक्तीच्या एकूण उत्पन्नापैकी निदान पन्नास टक्के उत्पन्न शेतीतून मिळालेले असेल अशा व्यक्तीलाच शेतकरी म्हणावे.'

सन २०२६-२७ची कर्जमाफी योजना जमेस धरून २०१७ ते २०२६ या काळात एकूण पाच कर्जमाफी योजना जाहीर झाल्या आहेत. गेल्या दहा वर्षांतील विविध कर्जमाफी योजनांची वारंवारिता आणि त्यामध्ये खर्च झालेली एकूण रक्कम याचा विचार केला तर महाराष्ट्र राज्य सातत्याने पहिल्या तीन-चार राज्यांमध्ये राहिले आहे. (इतर राज्ये कर्नाटक, तेलंगण, उत्तर प्रदेश) वारंवारितेबाबत मात्र महाराष्ट्राचा गेल्या दहा वर्षांमध्ये सातत्याने पहिला क्रमांक आहे. राज्यामध्ये २०१७ मध्ये दोन, २०१९ मध्ये दोन आणि आता २०२६ मध्ये एक अशा कर्जमाफी योजना झाल्या आहेत. या योजनासाठी खर्च झालेल्या एकूण रकमेमध्येसुद्धा महाराष्ट्र आघाडीवर आहे.

उपलब्ध आकडेवारीप्रमाणे २०१७ मध्ये ३४,००० कोटी, २०१९ मध्ये २२,००० कोटी आणि आता पुन्हा प्रस्तावित योजनेसाठी ३५,००० कोटी अशी एकूण रक्कम खर्च झाली आहे किंवा २०२६-२७ मध्ये व्हावयाची आहे. ही एकूण बेरीज ९१,००० कोटी होते. मात्र यामध्ये अत्यंत समाधानाची गोष्ट अशी की अंमलबजावणीचे प्रमाण मात्र इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रामध्ये अतिशय समाधानकारक राहिलेले आहे. सर्व योजनांचा एकत्रित विचार करता अंमलबजावणीचे प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा जास्त राहिले आहे. यामध्ये कोणत्या शेतकऱ्याला दरडोई किती मिळाले असावेत, ही सरकारी आकडेवारी उपलब्ध होत नाही. आपणच थोडी (कंटाळवाणी) आकडेमोड करू. सरकारी मदत बहुतेक वेळा लहान शेतकऱ्यांना दिली जाते. (ज्याचे कसणुकीचे क्षेत्र पाच एकरपेक्षा कमी आहे.) २०२१च्या शेतीच्या शिरगणतीप्रमाणे महाराष्ट्रामध्ये लहान शेतकरी एकूण १ कोटी ७० लाख इतके असून एकूण शेतकऱ्यांमध्ये लहान शेतकऱ्यांचे प्रमाण साधारण ८५ टक्के आहे.

९१ हजार कोटी या संख्येला १ कोटी ७० लाख या संख्येने भागल्यास भागाकार ५३,५२९ येतो. याचा अर्थ सोपा आहे. २०१७ ते २०२७ या दहा वर्षांमध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक लहान शेतकऱ्याला कर्जफेडीसाठी सरकारकडून साधारण ५३,००० रुपये मिळाले. दर वर्षी निदान पाच हजार रुपये! याबाबतीत तरी महाराष्ट्रातील लहान शेतकरी इतर राज्यांतील लहान शेतकऱ्यापेक्षा भाग्यवान दिसतो. मात्र हे कागदावरील गणित आहे हे विसरू नये.

सरकारच्या कर्जमाफी योजनांसंबंधीच्या माहितीवरून कोणासही असेच वाटेल, की महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमुक्त होण्याच्या मार्गावर आहे. जे अक्षम आहेत त्यांचे कर्ज सरकार फेडते आणि सक्षम आहेत ते स्वतःच कर्जफेड करत आहेत. एकूण परिस्थिती समाधानकारक आहे. शेती विकासही समाधानकारक असणार. परंतु दुर्दैवाने तसे मुळीच दिसत नाही. याबाबत सर्वांना विषण्ण करणारी गोष्ट म्हणजे आपल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या. दुर्दैवाने महाराष्ट्र जसा कर्जमाफी योजनांमध्ये आघाडीवर आहे तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येसुद्धा. आपण केवळ आघाडीवरच नाही, तर प्रथम क्रमांकावर आहोत. २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात ४,१५१ (प्रथम), कर्नाटक २,४२३ (दुसरा). आपण दुसऱ्या नंबराच्या दुप्पट आहोत. (२०२३ मध्ये गुजरात मात्र ५६४ आत्महत्या.) आपल्या राज्यातील बहुतेक शेतकरी आत्महत्या विदर्भातील कापूस उत्पादकांच्या आहेत. कर्जाचे (जड झाले) ओझे हे मुख्य कारण आहे.

दुसरे असे की औद्योगिकीकरण, आर्थिक विकास, परदेशी गुंतवणूक यामध्ये महाराष्ट्र (मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक) अव्वल असला तरी शेती विकासाबाबत तसे म्हणता येत नाही. कारण गेल्या दहा वर्षांत शेती विकासाचा वार्षिक सरासरी दर महाराष्ट्रामध्ये साडेतीन ते साडेचार टक्के एवढाच राहिला आहे. (याच काळात गुजरातमध्ये मात्र शेती विकास दर साधारण सहा टक्के राहिला आहे.) त्याचप्रमाणे उद्योगधंदे प्रगत असूनसुद्धा शेतीवरील कामगारांचे प्रमाण (भाऊगर्दी) लक्षणीयरीत्या कमी करणे आपल्याला जमलेले नाही. आजसुद्धा साधारण ५५ टक्के कामगार शेतीवर अवलंबून आहेत. महाराष्ट्राचा शेती विकास तसा वाईट/कमी नाही. परंतु एका बाजूस विकास आणि दुसऱ्या बाजूस आत्महत्या हा विरोधाभास लक्षात घेतल्यावर जो विकास झाला तो शेतकऱ्यामधील आर्थिक विषमता वाढविणारा झाला असावा, या विचाराला पुष्टी मिळते. त्यामुळे कर्जमाफीमध्ये उदार हस्ते मदत केल्यानंतरसुद्धा कर्जमुक्ती आणि समतापूर्ण शेती विकास साधण्यासाठी त्याचा विशेष उपयोग झाला नसावा. विशेषत: इतर काही राज्यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये एकसुद्धा कर्जमाफी न देता उत्कृष्ट शेती विकास साधला आहे हे लक्षात घेतल्यावर आपले दुःख अधिकच बोचते. शेतकऱ्याला विशेषतः लहान शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्वंकष शेती विकासाची गरज आहे. शेती विकासासाठी शेतीमध्ये भरघोस गुंतवणुकीची गरज आहे. येथेच आपण कमी पडलो आहोत. महाराष्ट्रात शेती विकाससंबंधीची गुंतवणूक विशेषतः सरकारी गुंतवणूक कमी पडते, असे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. उदाहरणार्थ, दीर्घ मुदतीचे सिंचन, वीज निर्माण इ. पायाभूत सोयीसाठी गुंतवणूक करण्याऐवजी महाराष्ट्राने शेतीवरील अनुदाने देणे, कर्जमाफी जाहीर करणे, मोफत वीजपुरवठा इ. अल्प मुदत योजनांवर भर दिला. आजमितीससुद्धा महाराष्ट्राचे सिंचन प्रमाण साधारण १८ ते २० टक्के असून ते गुजरात (४५ टक्के), मध्य प्रदेश (साधारण ४३ टक्के), कर्नाटकपेक्षा(साधारण ३० टक्के) कमी आहे. धरणांची संख्या महाराष्ट्रात देशामध्ये सर्वाधिक असूनसुद्धा महाराष्ट्राची शेती पावसावरच अवलंबून आहे. शेती मागासलेली राहते, शेतकरी अक्षमच राहतो आणि पुन्हा पुन्हा कर्जफेडीच्या योजना येतात. भविष्यात हे सर्व बंद (निदान कमी) करण्यासाठी शेतीमध्ये अधिक गुंतवणूक, पायाभूत सोयी निर्मिती आणि कर्जमाफीऐवजी व्याजमाफी, कर्ज मुदत वाढवणे, शून्य व्याजाने कर्ज देणे इत्यादी उपायांचा विचार करावा, असे सुचविल्यास चुकीचे होणार नाही असे वाटते.

# संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी प्रभु रामचंद्राचे आदर्श सर्वांनीच अंगीकारले पाहिजे



चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.महाराष्ट्रात नवीन वर्ष ''गुढीपाडवा'' म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले.त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते.आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच.यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूराचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे.त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील. कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते.कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू राचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला,रूषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्राची धुंद गुंजतांना दिसते.तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.आज अयोध्येतील राम मंदिरमुळे ''मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम'' या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे.आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते.प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे.कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी, स्वार्थीवृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवली आहे.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न(गुंग)असतात.''मु मे राम बगल में छुरी'' अशा प्रकारची असुरी भावना आजच्या ९५ टक्के राजकीय पुढाऱ्यांत दिसून येते.कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी ''रक्तबीज'' राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवीलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे आदर्श दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल.जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे. तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल.रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल.कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

**- रमेश कृष्णराव लांजेवार,**
नागपूर

***

# फॅशन, फेम आणि मॅक्स फॅशनची वीस वर्षे पूर्ण झाल्याचा एकत्र सोहळा; लॅक्मे फॅशन वीकमध्ये कल्की कोचलिन

नाशिक दि.२५ (प्रतिनिधी)- सिद्धांत चतुर्वेदी आणि अलाया एफ यांचा सहभाग दोन दशके, लाखो वॉर्डरोब आणि असंख्य 'स्टाईल मोमेंट्स'नंतर 'मॅक्स'ने केवळ आपला वर्धापनदिन साजरा केला नाही, तर भारतातील सर्वात प्रतिष्ठित रॅम्पपैकी भव्य अश्या फॅशन सोहळ्याचे आयोजन केले. लॅक्मे फॅशन वीकमध्ये आपले स्वागत आहे, ते ही मॅक्सचा अनोख्या अंदाज. दिवे मंदावले. संगीताचा सूर मंद झाला. अगदी त्याच क्षणी रनवे केवळ रनवे राहिला नाही, तर तो एका वेगळ्याच अनुभवात रूपांतरित झाला. एकूण ३५ विविध लूक्सच्या माध्यमातून जे काही सादर झाले, तो फक्त पारंपरिक असा फॅशन शो नव्हता. तर आजचा तरुण भारत प्रत्यक्षात कशा प्रकारे पेहराव करतो याचे जिवंत व स्पंदनशील चित्र होते. नाविन्यपूर्ण, आत्मविश्वासपूर्ण आणि आपल्या मूळ स्वभावाशी तसूभरही तडजोड न करणारी ही शैली होती. तीन अतिशय भिन्न ऊर्जा, पण एक निर्विवाद संदेश. कल्की कोचलिन, सिद्धांत चतुर्वेदी आणि अलाया एफ यांनी रॅम्पला नवी झळाळी दिली. तिघांची ऊर्जा अतिशय भिन्न अश्या होत्या, तरी त्यांच्या सादरीकरणातून एक स्पष्ट आणि निर्विवाद संदेश समोर आला. सिद्धांत चतुर्वेदी अलाया एफ कल्की कोचलिन सिद्धार्थ चतुर्वेदीने जेव्हा रनवेवर पाऊल ठेवले, तेव्हा फॅशन शोची सुरुवात अत्यंत उत्साहवर्धक आणि रोमांचक वातावरणात झाली. अवघ्या काही क्षणातच सिद्धार्थने या फॅशन शोला कला, संस्कृती आणि सादरीकरणाच्या एका अविस्मरणीय क्षणाचे असे रूप दिले. संगीताच्या ठेक्यावर आणि रोषणाईचे रंग बदलत असताना सिद्धार्थने 'मॅक्स अर्बन' विभागासाठी दमदार वातावरण निर्माण केले. त्याने आपल्या खास अशा शैलीदार अदा, उत्स्फूर्तता आणि सहजसुंदर कूल अंदाज मंचावर सादर केला. हा उत्साह पुढे नेत मॅक्स फॅशनच्या 'अर्बन' विभागाच्या सादरीकरणासाठी आलेल्या अलाया एफने रनवेवर आपली वेगळी छाप उमटवली. आत्मविश्वास आणि खेळकर वृत्ती ने परिपूर्णअसलेली अलाया एफ या कलेक्शनच्या धाडसी आणि अभिव्यक्तिशील शैलीचे एक मूर्तिमंत प्रतीक ठरली. अलाया एफचा रॅम्प वॉक अत्यंत चैतन्यमय आणि सहजस्फूर्त होता. हा असा फॅशन क्षण होता, जो आपल्या आठवण करून देतो की आजच्या काळातील स्टाईल म्हणजे केवळ कपडे नव्हेत. तर ती व्यक्तिमत्त्व, नवनवीन प्रयोग आणि कोणत्याही ठिकाणी स्वतःची ओळख निर्माण करण्याची वृत्ती आहे. त्यानंतर सिद्धांत पुन्हा एकदा रनवेवर परतला. यावेळी त्याने 'मॅक्स' ब्रँडची मूळ सौंदर्यशैली सादर केली.अत्यंत उत्साही आणि शहरी वातावरणातून अधिक निवांत व बहुआयामी फॅशन विश्वाकडे वळताना, त्याच्या या दुसऱ्या सादरीकरणातून 'मॅक्स' ब्रँडचा समकालीन आणि दैनंदिन शैलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून आला. ही शैली सहजसुंदर, आत्मविश्वासपूर्ण आणि परिधान करण्यास अत्यंत सोपी आहे. यानंतर रंगमंचावर अवतरला तो भव्य क्षण. शोचा मुख्य भाग असलेल्या आणि 'शोस्टॉपर' ठरलेल्या सादरीकरणात कल्की कोचलिनने जेव्हा रनवेवर पाऊल ठेवले, तेव्हा तिच्या उपस्थितीत वेगळेपणाची जाणीव आणि शांत, तरीही प्रभावी सामर्थ्य जाणवले. आपल्या संयत उपस्थितीने आणि वैशिष्ट्यपूर्ण शैलीने कल्कीने संपूर्ण रनवेवर आपले वर्चस्व गाजवले आणि या सादरीकरणाला अभिजाततेची झलक दिली. या संध्याकाळचा समारोप उत्सवी आणि भव्य अंतिम सादरीकरणाने झाला, जेव्हा कल्की कोचलिनसोबत सिद्धांत चतुर्वेदी आणि अलाया एफ हे देखील रनवेवर अवतरले आणि तिन्ही ब्रँड ॲम्बेसेडर्स एकाच मंचावर एकत्र आले. या त्रिकुटाने अत्यंत चैतन्यमय आणि ऊर्जेने भारलेल्या क्षणी शोची सांगता केली. हा क्षण केवळ शोचा शेवट वाटला नाही, तर तो फॅशन, व्यक्तिमत्त्व आणि 'मॅक्स'च्या भावनेचा एक भव्य उत्सवच भासला. या प्रदर्शनाच्या केंद्रस्थानी 'अनसिरियस एव्हरीथिंग' ही संकल्पना होती. विचारपूर्वक केलेली कारागिरी आणि फॅशनकडे पाहण्याचा खेळकर व निखळ दृष्टिकोन यांचा सुरेख मेळ या संकल्पनेत दिसून आला. हा संग्रह 'अर्बन' , 'स्पोर्ट्स कोर' आणि 'कोर कॅज्युअल' अशा तीन प्रमुख शैलींत सादर करण्यात आला होता, जो आधुनिक वेशभूषेतील सहजसुंदर आणि अभिव्यक्तिशील शैलीचे प्रतिबिंब आहे. अर्बन विभागाने महिलांसाठी सिट्रस प्रिंट्स, क्रोशे टेक्सचर्स आणि रिलॅक्स्ड को-ऑर्ड्स, तसेच पुरुषांसाठी लेमन प्रिंट्स, विंटेज फ्लोरल आणि हलक्या उन्हाळी सिल्हूट्स सादर करून उन्हाळ्याचा आल्हाददायक माहोल निर्माण केला.तर स्पोर्ट्स कोअर विभागाने महिलांसाठी क्रॉप्ड फिट्स, ट्यूब टॉप्स आणि ओव्हरसाईज्ड टीजच्या माध्यमातून उत्साही ॲथलिशर शैली सादर केली; तसेच मेन्सवेअरमध्ये पोलो, टीज आणि शॉर्ट्सवर बास्केटबॉल-प्रेरित ग्राफिक्स पाहायला मिळाले.त्यानंतर सादरीकरण कोर कॅज्युअलकडे वळले, जिथे हवेशीर कॉटन सिल्हूट्स, शांत निळे आणि क्रिस्प पांढरे रंग, तसेच रिलॅक्स्ड टेलरिंगने परिष्कृत दैनंदिन पेहराव अधोरेखित केला. या सादरीकरणाचा समारोप इंडो-वेस्टर्न फ्युजन क्षणाने झाला, जिथे इंडिगो आणि मातीच्या रंगांतील ओव्हरसाईज्ड बॉटनिकल मोटिफ्सनी रनवेला काव्यात्मक समारोपाची छटा दिली आणि बहुउपयोगिता, व्यक्तिमत्त्व व सहज शैलीवर आधारित पेहरावाच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. वीस वर्षांची यशस्वी वाटचाल अविरत सुरू भारतात वीस वर्षे पूर्ण करणे हा 'मॅक्स फॅशन'साठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. भारत हा नेहमीच चैतन्यमय आणि अभिव्यक्तीपूर्ण फॅशन बाजार राहिला आहे. गेल्या काही वर्षांत आम्ही अशा एका पिढीसोबत वाटचाल केली आहेआणि त्यांच्यासोबतच आमचीही वाढ झाली आहेजी स्टाईलकडे आत्मविश्वास, स्वतःचे वेगळेपण आणि उत्साही दृष्टिकोनातून पाहते.

या यशस्वी वाटचालीचा उत्सव हा 'लॅक्मे फॅशन वीक'मध्ये रॅम्प सादरीकरणाद्वारे साजरा करणे हा आम्हाला सर्वात योग्य मार्ग वाटला. सुमित चंदना, मुख्य कार्यकारी अधिकारी, मॅक्स फॅशन शिवाय रॅम्पपलीकडे जाऊन, 'मॅक्स'ने लॅक्मे फॅशन वीकच्या चारही दिवसांत एक विशेष 'ब्रँड अनुभव क्षेत्र' उभारले होते. या ब्रँड अनुभव क्षेत्रामध्ये संपादक, क्रिएटर्स आणि फॅशन क्षेत्रातील जाणकारांना मॅक्सच्या कलेक्शनचा अनुभव घेता आला तसेच ब्रँडचा दृष्टिकोनही समजून घेता आला. हा केवळ एक शो नव्हता; तर ते एक ठाम विधान होते. 'मॅक्स'ने भारताच्या फॅशन संस्कृतीसोबत वाटचाल करत आपली वीस वर्षे पूर्ण केली आहेत; आणि लॅक्मेच्या रॅम्पवरील सादरीकरण पाहता, पुढील वीस वर्षे त्याहूनही अधिक रंजक असणार आहेत.

# भारताच्या टेक एसएमई केंद्रस्थानी; नॅसकॉम तर्फे एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ मध्ये नवोपक्रम आणि नवोन्मेषकांचा सन्मान

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- भारताचा तंत्रज्ञानाधारित एसएमई क्षेत्र सध्या मुळे होणारे बदल, आर्थिक परिस्थितीतील बदल आणि वेगाने बदलणारी जागतिक मागणी यामुळे एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे आता नव्याने सुरुवात करणे, पुन्हा उभारणी करणे आणि पुढे नेतृत्व करणे ही गरज खूपच तातडीची झाली आहे. या पार्श्वभूमीवर नॅसकॉम ने आज एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ च्या चौथ्या आवृत्तीतील विजेत्यांची घोषणा केली, ज्यामध्ये भारताच्या वेगाने विकसित होत असलेल्या तंत्रज्ञान एसएमई इकोसिस्टममधील उत्कृष्टता, नवोन्मेष आणि लवचिकतेचा गौरव करण्यात आला. हे पुरस्कार अशा संस्थांना ओळख देतात ज्या केवळ व्यवसायवाढ साध्य करत नाहीत, तर विविध उद्योगांमध्ये तंत्रज्ञानाधारित परिवर्तनाचे भविष्य घडवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. बिझनेस एक्सलन्स, टेक्नॉलॉजी एक्सलन्स आणि स्पेशल रिकग्निशन अशा तीन प्रमुख श्रेणींमध्ये विभागलेले हे पुरस्कार संस्थेच्या यशाच्या विविध पैलूंना अधोरेखित करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. याशिवाय, उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील एसएमईसाठी दोन विशेष पुरस्कारही सुरू करण्यात आले असून, तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीतील त्यांच्या प्रयत्नांना आणि यशाला मान्यता देण्यात आली आहे. नॅसकॉम एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ मध्ये २५ उत्कृष्ट संस्थांचा सन्मान करण्यात आला, ज्यातून भारताच्या टेक एसएमई क्षेत्रातील सखोलता आणि विविधता अधोरेखित झाली. विजेत्यांमध्ये आरएस सॉफ्टवेअर, सम्यक इन्फोटेक, माइंडमॅप डिजिटल, नवसॉफ्ट, फाईव्हस डिजिटल, सीएसएम टेक्नॉलॉजीज, देसीक्रू, फिड्रॉक्स टेक्नॉलॉजीज, हूनारटेक, फिंगेट ग्लोबल सोल्युशन्स, झेनोव्हेक्स टेक्नॉलॉजीज आणि सॉफ्टडेल यांचा समावेश असून, वित्तीय सेवा, उत्पादन, हेल्थकेअर, रिटेल, गव्हटेक, एआय नवोन्मेष, लोकव्यवस्थापन आणि ग्रोथ लीडरशिप अशा विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच रायझिंग स्टार्स पुरस्कारांतर्गत वज्र ग्लोबल, हाल्टडोस, एमटच लॅब्स, व्हेंचरसाथी, क्लियरट्रस्ट आणि ग्रेडियंट एम आयटी कन्सल्टिंग अँड सर्व्हिसेस यांचा समावेश असून, वर्कफोर्स रेडीनेस, उदयोन्मुख तंत्रज्ञान, डिजिटल परिवर्तन, ग्राहकांवरील प्रभाव आणि लवचिकता या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानासाठी त्यांना गौरविण्यात आले. स्पेशल अवॉर्ड्स अंतर्गत इंटेग्रा, आयलेन्सिस, व्हीडार्ट इंक., रेडियन सॉफ्टवेअर आणि सेमेको प्लास्ट यांचा सन्मान करण्यात आला. तसेच अद्यासा महापात्रा आणि गायत्री ठक्कर यांना वैयक्तिक सन्मान प्रदान करण्यात आले. डेटा प्रायव्हसी, सीएसआर, ईएसजी, जागतिक विस्तार, तंत्रज्ञान स्वीकार, उद्योजकता आणि नेतृत्व या क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेण्यात आली. या सर्वांमधून नवोन्मेष, अनुकूलता आणि जागतिक स्पर्धात्मकतेत नवे मापदंड निर्माण करणाऱ्या एसएमई चे योगदान स्पष्टपणे दिसून येते.

नॅस्कॉम चे व्हाइस प्रेसिडेंट आणि हेड मेंबरशिप अँड आऊटरीच, श्रीकांत श्रीनिवासन, म्हणाले, ''भारताचे तंत्रज्ञानाधारित एसएमई सध्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. ते सक्रियपणे त्यांच्या वाढीच्या मॉडेल्सची पुनर्बांधणी करत आहेत, क्षमता नव्याने उभारात आहेत आणि एआय-आधारित जगासाठी टॅलेंट स्ट्रॅटेजीज पुन्हा परिभाषित करत आहेत. एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ या परिवर्तनाचे नेतृत्व आत्मविश्वासाने आणि स्पष्ट दृष्टिकोनासह करणाऱ्या संस्थांचा गौरव करतात. हे उद्योग त्यांच्या कार्यप्रणालीच्या केंद्रस्थानी बुद्धिमत्ता समाविष्ट करत आहेत आणि केवळ सेवा प्रदाते म्हणून नव्हे, तर जागतिक ग्राहकांना विश्वासाने अवलंबून राहता येतील असे धोरणात्मक भागीदार बनत आहेत.

# भागवत कथा अमृतमय: पंचप्राणांचे गूढ आणि मानव जीवनाचा उद्धार करते; प. पू. रमेश भाई ओझा यांचे प्रतिपादन





*** आत्ताच एक्सप्रेस**
**गोपालराव सरनायक**

**हिंगोली–** भागवत कथा ही केवळ धार्मिक ग्रंथ नसून ती जीवनाला दिशा देणारे अमृत आहे, असे प्रतिपादन प. पू. रमेश भाई ओझा यांनी बुधवारी कथा समाप्ती वेळी आपल्या प्रवचनात केले.

येथील रामलीला मैदानावर गजराज बाल गणेश मंडळाच्या पुढाकारातून बुधवारी प. पू. भाईश्री रमेश भाई ओझा यांचे श्रीमद भागवथा समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी रमेशचंद्र अग्रवाल, निकुंज अग्रवाल, कालवाडिया परिवार, कैलास चंद्र खंडेलवाल यांच्या वतीने ग्रंथाची पूजा करून भागवत कथेला सुरुवात करण्यात आली.

भाईश्री बोलताना म्हणाले, भागवत श्रवण केल्याने मनुष्याचे जीवन पवित्र होत असून त्याचा आध्यात्मिक उद्धार होतो, असे त्यांनी सांगितले.

प्रवचना दरम्यान मानव शरीरातील पंचप्राण आणि पंच उपप्राण यांचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे स्पष्ट करण्यात आले. शरीरात प्राणशक्ती नसल्यास कोणतीही हालचाल अशक्य आहे. हीच प्राणशक्ती सर्व सजीवांमध्ये यात कीटक, पशु, पक्षी, समान स्वरूपात अस्तित्वात आहे. मात्र, प्राणशक्ती कमी होत गेल्यास शरीराची ताकदही क्षीण होत जाते, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे भाईश्री म्हणाले, पंचप्राणांचे कार्य वेगवेगळे असून ते शरीराच्या विविध क्रियांना नियंत्रित करतात. त्यामध्ये रक्त शुद्ध करून ते संपूर्ण शरीरात पोहोचवण्याचे कार्यही समाविष्ट आहे.

विशेषतः हृदयासारखे महत्त्वाचे अवयव जन्मापासून अखंड कार्यरत असतात, ही परमेश्वराच्या अद्भुत रचनेची साक्ष असल्याचे नमूद करण्यात आले. यावेळी आधुनिक विज्ञानाशी तुलना करताना, परमेश्वराची सृष्टी आणि रोबोटिक तंत्रज्ञान यामध्ये मोठा फरक आहे, असे सांगण्यात आले. रोबोट हा यांत्रिक पद्धतीने तयार केलेला असून त्याचे हसणे-रडणे हे कृत्रिम असते. परंतु मानवातील भावना, चेतना आणि प्राणशक्ती ही दैवी देणगी आहे, जी कोणत्याही यंत्रात निर्माण करता येत नाही.

तसेच, मानव शरीर आणि देवत्व यातील भेद स्पष्ट करताना सांगण्यात आले की, मानव शरीर हे लोखंडासारखे आहे तर देवत्व हे चांदीसारखे तेजस्वी आहे. पारस मणीच्या स्पर्शाने जसे लोखंडाचे सोने होते, तसेच भागवत कथा आणि परमेश्वर भक्तीमुळे मानवाचे जीवन परिवर्तन घडते, असा सुंदर दृष्टांत देण्यात आला. या प्रवचनातून भाविकांना जीवनातील आध्यात्मिक मूल्यांची जाणीव करून देत भागवत श्रवण, नामस्मरण आणि सदाचार यांचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

**कार्यकर्त्यांनी काढला सामूहिक फोटो**

मागील पंधरा ते विस दिवसापासून गजराज बाल गणेश मंडळासह इतर मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कथा संपल्यानंतर भाईश्री सोबत सामूहिक फोटो घेतला.

# हिंगोलीच्या हळदीचा ग्लोबल ब्रँड सज्ज! ८ नाविन्यपूर्ण उत्पादनांतून आरोग्याचा खजिना घराघरांत पोहोचणार- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचा निर्धार

*** आत्ताच एक्सप्रेस**
**गोपालराव सरनायक**

**हिंगोली –** ज्याप्रमाणे द्राक्षासाठी नाशिक आणि आंब्यासाठी रत्नागिरी जिल्ह्याचे नाव जगप्रसिद्ध आहे, त्याच धर्तीवर आता हळद म्हटले की हिंगोली जिल्ह्याचे नाव अग्रक्रमाने घेतले जावे, यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. देशातील एकूण हळद उत्पादनापैकी १५ टक्के उत्पादन एकट्या हिंगोली जिल्ह्यात होते. याच पिवळ्या सोन्याला आता जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी प्रशासनाने हळदीपासून बनवलेली ८ विशेष उत्पादने आणि त्यांचे आकर्षक पॅकिंग बाजारात आणले असुन हिंगोलीचा सर्वत्र नावलौकिक झाले पाहिजे असे मत हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी व्यक्त केले आहे. हिंगोली येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांनी ही माहिती दिली.

यावेळी त्यांनी बचत गटांच्या माध्यमातून होणाऱ्या १ कोटींच्या उलाढीलीचा आराखडा मांडला, यावेळी त्यांनी विकसित केलेल्या या प्रॉडक्ट्समध्ये केवळ चवच नाही, तर आरोग्याचे अनेक गुणधर्म दडलेले आहेत, याची सविस्तर माहिती दिली.

जिल्हाधिकारी म्हणाले की, सध्या या उत्पादनांचे पॅकिंग छत्रपती संभाजीनगर येथून होते, मात्र भविष्यात हे सर्व काम हिंगोलीतील दुर्गामाता, शिवशक्ती, राजलक्ष्मी आणि पूजा या महिला बचत गटांच्या माध्यमातून केले जाईल. दिवाळीपर्यंत १ कोटींचा बिझनेस बचत गटांना द्यायचा आमचा मानस आहे. आतापर्यंत १५ लाखांचा बिझनेस पूर्ण झाला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

नाविन्यपूर्ण योजनेतून (डीपीडीसी) हिंगोलीचा हळद ब्रँड जागतिक स्तरावर नेण्यासाठी प्रशासन पूर्ण ताकदीने कार्य करत असून, या प्रकल्पामुळे हिंगोलीचे नाव आता कृषी उद्योगाच्या नकाशावर ठळकपणे उमटणार असल्याचे मत यावेळी बोलताना व्यक्त केले आहे. यावेळी हळदी पासून कोण कोणती उत्पादने करता येईल याबाबतीत सर्वांनी आपआपले विचार व्यक्त केल्यास सध्या आठ उत्पादने निर्माण केली आहे ती आपण आणखीन वेगवेगळ्या प्रकारच्या प्रमाणात करू असे सुद्धा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.




# विविध मागण्यासाठी शेतकऱ्यांनी टायर जाळत कनेरगाव जिंतूर रस्तावर आंदोलन



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यात मागील वर्षी शेतकऱ्यांचे अतिवृष्टीच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर सोयाबीन व इतर पिकांचे नुकसान झाले यानंतर राज्य सरकारने मोठ पॅकेज जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला मात्र राज्य सरकारने घोषित केलेला विमा अद्यापही शेतकऱ्यांना मिळाला नसल्याने शेतकरी रस्त्यावर उतरले होते

यासह हिंगोली जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी अवैध गौण खनिज उत्खनन झाल्यानंतर सुद्धा जिल्हाधिकारी यांनी गौण खनिज नियमानुसार भरणा केल्या नसल्याचे तक्रार शेतकऱ्यांनी केली यामध्ये अनेक कंपन्यांनी जिल्ह्यामध्ये अवैध उत्खनन केले व या उत्खननाला जिल्हा गौणखनिज अधिकारी व उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली

सेनगाव तालुक्यामध्ये आज जवळपास सहा महिन्यापासून कुठलाही रोजगार हमीचे काम चालू नसल्याने शेतकरी यांनी विहीर गायगोठे व इतर रोजगार हमीची कामे कधी करायचे असा प्रश्न शेतकऱ्यांनी विचार केला

हिंगोली जिल्ह्यांमध्ये सत्तरच्या वर बोगस जैविक पेस्टिसाइड कंपन्या कार्यरत असून यावर जिल्हा कृषी अधीक्षक चकार शब्दही बोलायला तयार नाहीत तसेच कारवाई करायला तयार नाहीत या अनुषंगाने क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी तथा शेतकरी यांनी दि.२४०३२०२६ मंगळवार रोजी सकाळी ११. ३० कनेरगाव जिंतूर महामार्ग हाताळा फाटी या ठिकाणी अडवून टायर जाळले व जिल्हा प्रशासनाचा निषेध व्यक्त केला यावेळी प्रशासनाच्या वतीने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता

यामध्ये गजानन कावरखे (मराठवाडा अध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना),नामदेव पतंगे, सतीश इडोळे,प्रवीण मते,राहुल कावरखे,बबन कावरखे,अशोक कावरखे,दीपक सावके, शांतिराम सावके.यासह मोठ्या संख्येने शेतकरी, आणि सर्व विभागाचे अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

# मोफत गुडघा व नितंब प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत आयोजित करण्यात आलेले मोफत गुडघा व नितंब प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या संपन्न झाले. ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने तसेच संजीवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने पार पडले. या शिबिरात एकूण ७० रुग्णांनी सहभाग घेतला असून त्यापैकी २६ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची सखोल तपासणी करून त्यांना आवश्यक त्या उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच गरजू रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनात डॉ. अन्सारी, डॉ. दिपेन शर्मा, आवैज खान, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन भोसले, समाजसेवा अधीक्षक डॉ. संतोष शेंडगे, सोमनाथ वानखेडे व आदिल खान यांचे विशेष योगदान राहिले.आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी हे शिबिर अत्यंत लाभदायक ठरले असून नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेबद्दल आयोजकांनी सर्व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.

# कर्तव्यावर असताना तंबाखू-गुटखा सेवन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई कारवाईत १३ जणांकडून एकूण २६०० रुपयांचा दंड वसूल

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** कर्तव्यावर असताना तंबाखू व गुटखा सेवन करणाऱ्या शासकीय कर्मचारी व इतर व्यक्तींविरुद्ध जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत १३ जणांकडून एकूण २६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या आदेशानुसार, अधिष्ठाता चक्रधर मुंगल व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक शंकर तावडे यांच्या सहकार्याने आज जिल्हा परिषद येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये ही कारवाई करण्यात आली. कर्तव्यावर असताना तंबाखूयुक्त पदार्थांचे सेवन करणे किंवा ते बाळगणे यामुळे कोटपा-२००३ कायद्याच्या कलम ४ चे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधितांवर दंड ठोठावण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यापूर्वीच शासकीय कार्यालय परिसर व शाळांच्या आवारातील पानटपऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ही मोहीम राबविण्यात येत असून, जिल्हाभरात अशी कारवाई पुढेही सुरू राहणार आहे.

ही कारवाई जिल्हा सल्लागार डॉ. किरण लोंढे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी कुलदीप केळकर (मानसशास्त्रज्ञ) व आनंद साळवे (सोशल वर्कर) आदींचा सहभाग होता.

कोटपा कायदा २००३ अंतर्गत प्रमुख तरतुदी : कलम ४ : सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी आहे. कलम ५ : तंबाखूयुक्त पदार्थांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिरातीस बंदी आहे. कलम ६ (अ) : १८ वर्षांखालील व्यक्तींना तंबाखू विक्री करणे किंवा त्यांच्याकडून विक्री करून घेणे दंडनीय गुन्हा आहे. कलम ६ (ब) : शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्रीस बंदी आहे. कलम ७, ८, ९ : तंबाखू उत्पादने पॅकेटवर ८५ टक्के भागावर वैधानिक इशारा आवश्यक आहे.

# शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य पुरस्कारार्थीच्या सत्कारासह रंगले काव्य संमेलन

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ हिंगोली संचलित शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समाजसेवा पुरस्काराच्या मानकरी उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या, जिजाऊ ब्रिगेड राष्ट्रीय संघटक श्रीमती सुनिता मुळे, सुप्रसिद्ध हिंदी कवयित्री, हिंदी काव्य पुरस्कार विजेत्या सुमन गोपाल दुबे ''स्वामिनी''यांच्या सत्कारासह हिंगोली येथील सुप्रसिद्ध कवी कवयित्री यांचे काव्य संमेलन संपन्न झाले. या समारंभाच्या अध्यक्षा श्री

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सौ. मंदाताई पवार, यावेळी प्रमुख उपस्थिती माजी शिक्षणाधिकारी संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव पवार, मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर, ''थवा'' प्रकाशनचे संचालक गोडाती काळे, साहित्यिक कलानंद जाधव, रतन आडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामदास मुक्ते, उपप्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर, कवयित्री संगीता चौधरी, पारिजात देशमुख, विजया पतंगे, राधिका देशमुख, अश्विनी देशमुख, कवी रघुवीर पतंगे, काळे, यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

समारंभात मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त श्रीमती सुनिता मुळे, हिंदी साहित्य पुरस्कार प्राप्त सुमन गोपाल दुबे ''स्वामिनी'' यांचा दिव्यभव्य सत्कार श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ हिंगोली यांच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर, माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, सौ मंदाताई पवार, श्रीमती सुनिताताई मुळे, साहित्यिक सुमन गोपाल दुबे स्वामिनी, यांची मार्गदर्शनपर भाषणे संपन्न झाली.

यानंतर मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेच्या वतीने नामवंत कवीचे काव्यसंमेलन संपन्न झाले. यात हिंगोली येथील सुप्रसिद्ध कवी कवयित्रींनी बहुविध रसातील काव्याचे अप्रतिम सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले .आभार प्राचार्य डॉ. रामदास मुक्ते यांनी मानले. सूत्रसंचालन साहित्यिक प्रा. धाराशिव वैजनाथराव शिराळे यांनी केले.

या समारंभासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. काव्याच्या सादरीकरणासह मान्यवरांचा सत्कार निश्चितच मार्गदर्शनासह प्रेरणादायी असाच संपन्न झाला.

# नामस्मरणातून सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह; चिंतनाने नकारात्मकता दूर; कथेची समाप्ती, रमेश भाई ओझा यांचे प्रतिपादन

*** आत्ताच एक्सप्रेस**
**निलेश गरवारे**

**हिंगोली–** परमेश्वराचे ध्यान आणि नामस्मरण केल्याने मनुष्याच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे प्रतिपादन प. पू. रमेश भाई ओझा यांनी बुधवारी कथेच्या समाप्ती वेळी येथे केले. हिंगोली येथे आयोजित श्रीमद भागवत कथेची सांगता महाप्रसादानंतर भावपूर्ण वातावरणात करण्यात आली.

भाईश्री बोलताना म्हणाले, दररोज केवळ दहा मिनिटे सकारात्मक चिंतन केल्यास मनातील नकारात्मक ऊर्जा पूर्णपणे नष्ट होते. आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक शांतता मिळवण्यासाठी नामस्मरण हा अत्यंत सोपा आणि प्रभावी मार्ग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी श्रीमद भागवतामधील विविध पैलूंवर प्रकाश टाकताना सांगितले की, भागवतात चरित्र, उपदेश, रूपक, गीत आणि स्तुती यांचा सुंदर संगम आहे. राजा परीक्षिताची कथा सांगत त्यांनी जीवनातील सत्य आणि धर्माचे महत्त्व अधोरेखित केले.

भागवतातील स्तुतीचा मोठा हिस्सा अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगताना त्यांनी उदाहरण दिले की, जसे मानवी शरीरात पाण्याचा हिस्सा अधिक असून तो जीवनासाठी आवश्यक असतो, तसेच स्तुती ही अध्यात्मिक उन्नतीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर ''जपले का हरीनाम'' हे भजन सादर करण्यात आले, ज्यामुळे परिसर भक्तिमय झाला. पुढे रजोगुण, तमोगुण आणि सत्वगुण यांचे सविस्तर विवेचन करत त्यांनी मानवाच्या स्वभावावर या गुणांचा होणारा परिणाम स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या सांगतेवेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिरसाचा आनंद घेतला. यावेळी कथा मंडप खचाखच भरल्याचे दिसून आले.

**भागवत कथेच्या समाप्ती नंतर हजारो भविकांनी घेतला महाप्रसाद**

हिंगोली शहरात मागील सात दिवसापासून सुरु असलेल्या श्रीमद भागवत कथेच्या बुधवारी शेवटच्या दिवशी कथेला पूर्ण विराम देण्यात आला. त्यानंतर दुपारी दोन वाजल्यापासून ते सायंकाळी पर्यंत किमान हजारो भावीकानी महाप्रसादाचा लाभ घेतला.

येथील रामलीला मैदानावर शहरातील प्रसिद्ध असलेल्या गजराज बाल गणेश मंडळाच्या पुढाकारातून प. पू. भाईश्री रमेश भाई ओझा यांच्या मधुर वाणीतून श्रीमद भागवत कथेला गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावार म्हणजेच १९ मार्च ते २५ मार्च या कालावधीत भागवत कथेला सुरुवात झाली.

मागील सात दिवस भाईश्री यांनी आपल्या रसाळ व मधुर वाणीतून गुरुवारी कथेला प्रारंभ केला, तर शुक्रवारी आणि शनिवारी नित्यकथा सांगितली त्यांनंतर रविवारी कृष्णजन्मा वर विविध सार सांगत पैलूवर मार्गदशन केले. सोमवारी गोवर्धन पूजा आणि मंगळवारी रुख्मिणी विवाह याबाबत उलगडा केला. दरम्यान, बुधवारी शेवटच्या दिवशी सकाळी साडे नऊ ते एक यावेळेत कथेचा समारोप आरती नंतर झाला. त्यानंतर महा प्रसादाला सुरुवात झाली यावेळी हजारोच्या संख्येने भाविकांनी महाप्रसाद घेतला. या श्रीमद भागवत कथेसाठी गजराज बाल गणेश मंडळासोबत विशाल व्यायाम शाळा, हनुमान व्यायाम शाळा, राजस्थान व्यायाम शाळा, त्रिशूल नवदुर्गा मोहत्सव समिती, तुलसी मानस मंडळ, वैष्णव नवदुर्गा महोत्सव समिती, सिंधी सेवा समिती, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व्यायाम शाळा,विश्व हिंदू परिषद, युवा लिंगायत गवळी ग्रुप, विशाल नवदुर्गा समिती, उडान फाऊंडेशन, हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघ मराठवाडा चेंबर संलग्न, हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघ, हरिओम सत्संग, रामराज्य मित्र मंडळ, आदिनी परिश्रम घेतले.



# महावितरणमधील कंत्राटी कामगारांच्या पिळवणुकीचा प्रश्न आता मुंबईत; मनसेची व्यवस्थापकीय संचालकांकडे धडक

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – नांदेड मंडळातील किनवट उपविभागाअंतर्गत महावितरण कंपनीत गेल्या दहा वर्षांपासून कंत्राटी कामगारांची होत असलेली आर्थिक आणि मानसिक पिळवणूक, पगारातील भ्रष्टाचार आणि नियमबाह्य पदच्युतीचा मुद्दा आता थेट मुंबईपर्यंत पोहोचला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महावितरणच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे लेखी तक्रार केली असून, भ्रष्ट अधिकारी व गुत्तेदारांवर कठोर कारवाईची मागणी मनसेचे जिल्हाउपाध्यक्ष नितीन मोहरे यांनी तक्रारीत केली आहे.

मनसेने दिलेल्या निवेदनात खळबळजनक आरोप करण्यात आले आहेत. नांदेड जिल्ह्यातील किनवट महावितरण उपविभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना प्रत्यक्ष वेतन न देता केवळ ८ ते १० हजार रुपये फोन पेद्वारे पाठवले जातात. उर्वरित वेतनावर अधीक्षक अभियंता, एचआर मॅनेजर, डेप्युटी सीआरओ आणि संबंधित कंत्राटदार डल्ला मारत असल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे, कामगारांचे काम किनवटमध्ये असताना त्यांचे पगार परळी, माजलगाव आणि पुणे येथील बँकांमध्ये जमा केले जात असून, हा एक मोठा आर्थिक घोटाळा असल्याचे निवेदनात नमूद केले आहे

किनवट उपविभागाचे उपअभियंता केंद्रे यांचे कंत्राटदाराशी अर्थपूर्ण संबंध असुन दोघेही त्यांच्या मर्जीनुसार जुन्या कामगारांना काढून नवीन कामगारांकडून २० ते २५ हजार रुपये घेऊन कामावर घेत आहेत असा आरोप मनसेने केला आहे.जे प्रत्यक्ष काम करत आहेत त्यांना वेतन नाहीत आणि जे कामावर नाहीत त्यांच्या नावे पगार उचलला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असुन या संदर्भात वारंवार निवेदने तक्रारी करून सुद्धा वरिष्ठाकडून दखल घेण्यात आली नाही. कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी मनसेने नांदेड येथील मुख्य अभियंता कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केले होते, मात्र तरीदेखील कंत्राटी कामगारांचे प्रश्न सुटले नाहीत. किनवट उपविभागाअंतर्ग त कंत्राटी विद्युत कामगारांची आर्थिक व मानसिक पिळवणूक तसेच वेतन घोटाळ्याच्या साखळीत उपअभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, संबंधित गुत्तेदार यांची मिलीभगत असल्यामुळेच स्थानिक पातळीवर कोणतीही कारवाई होत नाही.

स्थानिक पातळीवर न्याय मिळत नसल्याने अखेर मनसेने हा प्रश्न मुंबई येथील महावितरणच्या मुख्य कार्यालयात व्यवस्थापकीय संचालकांच्या दालनात मांडला असुन मनसेच्या वतीने सादर केलेल्या पुरव्याच्या आधारे उपअभियंता केंद्रे यांचे निलंबन करावे आणि संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी आग्रही मागणी नितीन मोहरे यांनी केली असुन आता महावितरणचे महाव्यवस्थापक यावर काय पाऊल उचलते, याकडे सर्व कामगारांचे लक्ष लागले आहे.

# नांदेडकरांनो सावधान! पेट्रोल टंचाईच्या अफवा; जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट आवाहन

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**



**नांदेड** – शहरात पेट्रोल-डिझेल टंचाईबाबत पसरत असलेल्या अफवांमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असले, तरी प्रत्यक्षात कोणताही तुटवडा नसल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले आहे. सोशल मीडियावर फिरणारे मेसेज पूर्णपणे दिशाभूल करणारे असून नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, काही पेट्रोल पंप तात्पुरते बंद असल्याने नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. मात्र, या मागील मुख्य कारण म्हणजे ''पॅनिक पर्चेस'' असल्याचे प्रशासनाने सांगितले. म्हणजेच, जे नागरिक नेहमी ठराविक प्रमाणात इंधन घेतात, ते सध्या टँक फुल करून घेत आहेत. यामुळे पंपांवर अचानक मोठी गर्दी होत असून उपलब्ध यंत्रणांवर ताण येत आहे. परिणामी, टँकर येईपर्यंत स्टॉक लवकर संपत आहे.

याशिवाय, इंधन पुरवठा प्रक्रियेतही बदल करण्यात आले आहेत. पेट्रोल-डिझेल पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी ॲडव्हान्स पेमेंट प्रणाली लागू केल्यामुळे टँकर येण्यास काहीसा विलंब होत आहे. पूर्वी टँकर आल्यावर चार दिवसांत पेमेंट होत असे, मात्र आता आधी पेमेंट केल्यावरच टँकर रवाना केला जातो.

तथापि, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पेट्रोल व डिझेलचा साठा उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी अनावश्यक साठेबाजी टाळून संयम राखला, तर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.



# डीजे वाजविल्यास जप्तीसह गुन्हे दाखल करणार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांचा शांतता समितीच्या बैठकीत इशारा

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – पवित्र श्रीराम नवमी तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त माहूरच्या पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांनी शांतता समितीचे सदस्य तसेच उपस्थित जयंती उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांना डीजे वाजविल्यास डीजे जप्त करून गुन्हे दाखल करणार असल्याचा इशारा देऊन डीजे वाजवू नका असे आवाहन केले

माहूर शहरासह तालुका भरात श्रीराम नवमी सह डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो ठीक ठिकाणी अभिवादन मिरवणुका काढल्या जातात बैठकीत अनेक वर्षापासून डीजे वाजवू नका असे आवाहन पोलीस विभागामार्फत करण्यात येते तसे शासनासह न्यायालयाचे आदेश सुद्धा आहेत परंतु अनेक मिरवणुका डीजे वाजविला जातो त्यामुळे श्रीमती अर्चना पाटील यांनी धार्मिक उत्सव मिरवणुकीत महिलांनी बालकांनी सहभाग घ्यावा यासाठी कुठलेही त्रासदायक काम नको याची काळजी घेण्याचे आवाहन केले

यावेळी शांतता बैठकीत अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील पोलीस निरीक्षक देविदास चोपडे सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके पत्रकार सौ सुरेखा तळणकर ज्येष्ठ पत्रकार विजय आमले वसंत कपाटे नंदकुमार जोशी राज ठाकूर नगरसेवक गोपू महामुने मनोज कीर्तने मेघराज जाधव आकाश कांबळे अपील बेलखोडे निसार कुरेशी रावजी राठोड कैलास फड यांचे सह कार्यकर्ते पोलीस बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोकुंद्यात 'शांतीनिकेतन'चा बेकायदेशीर गोंधळ उघड शिक्षण विभागाचा थेट इशारा, पालकांनी सावध राहा!

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – किनवट तालुक्यातील गोकुंदा येथे सुरू असलेल्या 'शांतीनिकेतन पब्लिक स्कूल'च्या अनधिकृत कारभाराचा अखेर भांडाफोड झाला असून शिक्षण विभागाने कडक कारवाईचा इशारा देत पालकांना थेट सावध केले आहे. शासनाची स्पष्ट मान्यता कोठारी (चिखली) येथे असताना, कोणतीही स्थलांतर परवानगी न घेता गोकुंद्यात शाळा सुरू करून संस्थेने नियमांना सरळ तिलांजली दिल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.






या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शिक्षण विभागाने थेट शाळेच्या प्रवेशद्वारावर जाहीर प्रगटन लावून ''या शाळेत प्रवेश घेऊ नका'' असा स्पष्ट इशारा दिला आहे. गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने यांच्या आदेशानुसार ही धडक कारवाई करण्यात आली असून, तीन दिवसांच्या आत शाळा मूळ ठिकाणी म्हणजेच कोठारी (चिखली) येथे सुरू न केल्यास यू-डायस क्रमांक निलंबित करण्याचा थेट अल्टिमेटम देण्यात आला आहे.

रयत प्रतिष्ठान, गवंडगाव तांडा (ता. देगलूर) या संस्थेला कोठारी (चिखली) येथे इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरू करण्याची शासनमान्यता असताना, संस्थेने नियमांची पायमल्ली करत गोकुंद्यात शाळा सुरू केली. ना स्थलांतराची परवानगी, ना कायदेशीर प्रक्रिया थेट अनधिकृत शिक्षणाचा बाजार मांडल्याचा आरोप आता ठळकपणे समोर आला आहे.

या गंभीर प्रकारावर अनेक वेळा वर्तमानपत्रांतून बातम्या प्रसिद्ध होऊनही संबंधित प्रशासनाने सुरुवातीला दुर्लक्ष केल्याची चर्चा रंगली होती. मात्र पत्रकार लक्ष्मीकांत मुंडे व राज माहूरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि युवासेना कार्यकर्ते दया पाटील यांनी दिलेल्या लेखी तक्रारीमुळे अखेर प्रशासनाला जाग आली. जिल्हा परिषद नांदेडच्या शिक्षणाधिकारी (प्रा) वंदना फुटाणे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी थेट शाळेच्या गेटवर नोटीस लावून हा बेकायदेशीर प्रकार जाहीर केला.

नोटीसमध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, शाळेला मान्यता कोठारी (चिखली) येथे असून गोकुंदा येथे सुरू असलेली शाळा पूर्णपणे अनधिकृत आहे, त्यामुळे पालकांनी येथे प्रवेश घेऊ नये. यासोबतच तीन दिवसांच्या आत शाळा शासनमान्य ठिकाणी सुरू न केल्यास यू-डायस क्रमांक निलंबित करून शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, सर्वात मोठा सवाल असा उपस्थित होत आहे की, इतक्या दिवसांपासून ही अनधिकृत शाळा बिनधास्तपणे सुरू असताना प्रशासन नेमके काय करत होते? विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या या प्रकारावर आधीच कारवाई का झाली नाही, असा संतप्त सवाल पालकांकडून विचारला जात आहे.

एकंदरीत, शिक्षणाच्या नावाखाली सुरू असलेला हा बेकायदेशीर खेळ आता उघड झाला असून नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई अटळ असल्याचे स्पष्ट झाले आहे. पालकांनी सावध राहून आपल्या मुलांच्या भवितव्याशी कोणतीही तडजोड करू नये, असे स्पष्ट आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

# पत्रकारितेतील जिद्द फळाला; बिडकर यांची तेलंगणा राज्याध्यक्षपदी नियुक्ती

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**नांदेड** – नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील गजानन गंगाधरराव बिडकर यांची पुरोगामी पत्रकार संघ (भारत) च्या तेलंगणा राज्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या ते हैदराबाद येथे वास्तव्यास असून, त्यांच्या निवडीमुळे पत्रकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गजानन बिडकर हे मागील दहा ते बारा वर्षांपासून हैदराबाद येथे स्थायिक असून, देगलूर येथून ''साप्ताहिक महिमा खादीचा'' हे वर्तमानपत्र चालवतात. लहानपणापासूनच त्यांना लिखाणाची आवड असून त्यांनी आपल्या पत्रकारितेची सुरुवात दैनिक प्रजावाणी मधील छोट्या-मोठ्या लेखांपासून केली. त्या काळातील संपादक सुधाकर डोईफोडे यांनी त्यांच्या लेखनाला प्रोत्साहन देत त्यांच्या सुप्त



गुणांना वाव दिला.

यानंतर त्यांनी विविध वर्तमानपत्रांमध्ये सातत्याने लेखन करत आपली ओळख निर्माण केली. दैनिक नांदेड सांज मध्ये शहर प्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांनी पत्रकारितेचे बारकावे आत्मसात केले. तसेच धर्माबाद येथील प्रेमसिंग चव्हाण यांच्या साप्ताहिक ''नव्या युगाची वाटचाल'' मध्ये संपादकीय जबाबदारी सांभाळत त्यांनी पत्रकारितेतील अनुभव अधिक समृद्ध केला. हैदराबादमध्ये वास्तव्यास आल्यानंतरही त्यांनी आपली लेखणी थांबू दिली नाही. समाजातील सामान्य व्यक्तींच्या गुणविशेषांवर प्रकाश टाकत, तळागाळातील कार्यकर्त्यांच्या बातम्यांना आपल्या वर्तमानपत्रात व पोर्टलमध्ये स्थान देण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत नांदेड येथील दैनिक शिरोमणीचे संपादक शंकरसिंह ठाकूर व ''नंदगिरीचा कानोसा'' चे मुख्य संपादक मारुती शिकारे यांनी त्यांना राज्याध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या निवडीची माहिती समजताच हैदराबादमधील मराठी बांधव व पत्रकारांनी त्यांचे अभिनंदन केले असून, भविष्यात आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी गजानन बिडकर यांनी संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी तसेच संघटनेच्या प्रचार-प्रसारासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



# वृत्तपत्र उद्योगाच्या बचावासाठी व्हॉईस ऑफ मीडियाचे निवेदन

## १५०% जाहिरात दरवाढीसह विविध मागण्यांसाठी शासनाकडे धाव

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

श्रीक्षेत्र माहूर – राज्यातील वृत्तपत्र उद्योग गंभीर आर्थिक संकटातून जात असून त्याच्या संरक्षणासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम, तालुका शाखा माहूर यांच्या वतीने राज्य सरकारकडे माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप यांचे मार्फत संघटित निवेदन सादर करण्यात आले

दि. २५ मार्च २०२६ रोजी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना उद्देशून हे निवेदन मा. तहसीलदार, माहूर यांच्यामार्फत पाठविण्यात आले. या निवेदनात वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून सध्या वाढत्या खर्चामुळे तो अडचणीत सापडल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनानुसार, सन २०१९ पासून कागद, मुद्रण साहित्य, वीज व इतर खर्चामध्ये तब्बल १५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, शासकीय जाहिरात दरात त्यानुसार वाढ करण्यात आलेली नाही. यामुळे विशेषतः लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत शासकीय जाहिरात दरात किमान १५०% वाढ करावी ई-टेंडर व शासकीय जाहिराती पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध कराव्यात

जाहिरातींसाठी किमान १०० चौ. से. आकार निश्चित करावा जाहिरात देयके ३० दिवसांत अदा करून विलंब झाल्यास व्याज द्यावे लघु व मध्यम वृत्तपत्रांना जाहिरात वाटपात समान संधी द्यावी सर्व शासकीय जाहिराती माहिती खात्यामार्फत देण्याची सक्ती करावी.

**प्रलंबित देयके तात्काळ अदा करावीत**

१० वर्ष सेवा असलेल्या पत्रकारांना अधिस्वीकृती व २० वर्ष सेवा व ५५ वर्ष वय पूर्ण झालेल्यांना पेन्शन लागू करावी वृत्तपत्र उद्योग मजबूत राहिल्यासच जनतेच्या माहितीच्या अधिकाराचे संरक्षण होऊ शकते. त्यामुळे शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर व्हॉईस ऑफ मीडिया, माहूरचे तालुकाध्यक्ष इलियास बावाणी, जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले, तालुका सरचिटणीस संजय बनसोडे, फिरोज पठाण, गजानन कुलकर्णी, सचिन बेहेरे सय्यद किरमाणी आदी पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डीजे वाजविण्यास परवानगी देऊ नका, शिवसेना तालुका संघटक विनोद पाटील सूर्यवंशी यांची पोलिसांकडे निवेदनाद्वारे मागणी

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

श्रीक्षेत्र माहूर – माहूर शहरात विविध महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी निमित्य व इतर प्रासंगीक आनंदोत्सवात मोठ्या व कर्णकर्कश आवाजात डीजे लावल्या जातात. सदरील डीजेच्या कर्णकर्कश व मोठ्या आवाजाने शहरातील बालके व हृदयविकाराचे आजार असणारे शहरातील नागरिक यांना खूप त्रास सहन करावा लागतो त्यामुळे कुठल्याही कार्यक्रमात डिजे लावण्यासाठी परवानगी देऊ नये अशी मागणी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांचे कडे निवेदनाद्वारे शिवसेनेचे तालुका संघटक विनोद पाटील सूर्यवंशी यांनी केली आहे

डीजे च्या आवाजाने अनेक नागरिकांना तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल होऊन मृत्यूशी झुंज देण्याची सुद्धा गंभीर वेळ येते. सुदैवाने आज पर्यंत अशी एखादी जीवितहानीची घटना घडली नसली तरीही भविष्यात एखादी दुर्दैवी घटना घडणारच नाही याची कुणीही शास्वती देऊ शकत नाही.

करिता पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून जगभर ओळख असलेल्या माहूर या तीर्थक्षेत्रावर सर्व प्रकारच्या मिरवणुका पारंपारिक वाद्य, मंगल वाद्य लावून होणे आवश्यक असून डीजे या वाद्याला कायमस्वरूपी बंदी घालणे आवश्यक आहे.

माहूर शहरात कोणत्याही महापुरुष जयंती मिरवणूक असो किंवा धार्मिक कार्यक्रम असो त्यामध्ये डीजे लावण्यास परवानगी देण्यात येऊ नये व डीजे मुक्त मिरवणुकीचे शहर घोषित करण्यात यावे अशी विनंती शिवसेनेचे तालुका



संघटक विनोद पाटील सूर्यवंशी यांनी निवेदनाद्वारे उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांचे कडे केल्याने डीजे मुक्ती वर काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813